मा.श्री. प्रकाश महाजन (भाप्रसे) जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३.०१.२०१२ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्त ( स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय धुळे )

---

सभेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. सभेत खालील प्रमाणे विषय निहाय चर्चा झाली.

| क्र. | विषय | अनुपालन | |
|---|---|---|---|
| १ | मागील सभा दिनांक २९.११.२०११ रोजी झालेल्या झुम सभेचे इतिवृत्त मंजुर करणे | दि.१२९.११.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त पत्र क्र. ५८३२ ते ५८८९ दिनांक १५.१२.२०११ नुसार सर्व सदस्यांना पाठविण्यांत आलेले असुन इतिवृत्तावर कोणाचाही वेगळा अभिप्राय नसल्याने सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. | |
| २ | मागील सभेच्या इतिवृत्तानुसार प्रलंबित असलेल्या मुद्यांचा आढावा घेणेबाबत | | |
| १ | धुळे मऔविम क्षेत्रातील मुलभुत सुविधा – पाणी, रस्ते, पथदिवे इ. बाबत - सर्व औ.संघटना- १८०६१०(७) | धुळे औ.क्षेत्रातील रस्ते दुरुस्तीच्या कामाचे प्रारुप निविदेस वरिष्ठ कार्यालयाची मंजुरी प्राप्त झाली असुन निविदा प्रसिध्द करण्यांत आली आहे. तसेच उंच पाण्याच्या टाकी बांधणेच्या कामाची प्रारुप निविदेस मंजुरी अद्याप प्राप्त नाही असे का.अ.मऔविम यांनी सांगितले. सदर विषय ब-याच काळापासुन प्रलंबीत असल्याने का.अ.मऔविम यांनी वरिष्ठांकडे पाठपुरावा करुन पुढील सभेपुर्वी अनुपालन सादर करावे असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | का.अ. मऔविम धुळे |
| २ | सध्या मऔविम मध्ये उपलब्ध असलेले भुखंड, .त्यांची मागणी व विहीत मुदतीत बांधकाम पुर्ण न केलेले भुखंड परत घेणे बाबत – श्री नितीन बंग, मु.प्र. खांदेश औ.विकास परिषद १८०६१०(७) | मऔविमने ७ भुखंड ताब्यात घेतले असुन ४२ भुखंडाची ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सांगितले. श्री नितीन बंग मुख्य प्रवर्तक यांनी सांगितले की, ज्या भुखंडावर बांधकाम झालेले नाही त्यांची यादी प्रा.अ. मऔविम यांचेकडुन व ज्या भुखंडावर बांधकाम पुर्ण झालेले आहे अशा घटकांची यादी किंवा नळ कनेक्शन दिलेल्यांची यादी का.अ. मऔविम यांचेकडुन मिळणे अपेक्षित आहे.<br>या बाबत सविस्तर चर्चा होवुन सबंधीतांनी तात्काळ आपापल्या याद्या श्री बंग यांना उपलब्ध करुन द्यावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ का.अ. मऔविम धुळे |
| ३ | धुळे मऔविम क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत - लघु उद्योग भारती २३०६०९(११) | मऔविम क्षेत्रातील ५२ अतिक्रमण धारकांची यादी अंतिम केली असुन भुखंडाचे लेआवुट प्रस्ताव मऔविम मुंबई यांना सादर केलेला असल्याचे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सांगितले. सदर विषय ब-याच काळापासुन प्रलंबीत असुन प्रस्ताव मान्यतेसाठी मऔविमने तात्काळ पाठपुरावा करुन मान्यतेनंतर भुखंड वाटपाची कार्यवाही करावी तसेच यापुढे नविन अतिक्रमण होणार नाही मऔविमने दक्षता घ्यावी. | प्रा अ मऔविम धुळे |
| ४ | धुळे मऔविम वसाहत क्षेत्रात नविन भुखंड उपलब्ध करणे बाबत - सर्व संघटना -१८०६१०(७) | मऔविम क्षेत्रा शेजारील १०० हेक्टर क्षेत्रामध्ये शासनाची व खाजगी जमीन किती आहे याची मोजणी करणेसाठी रुपये तातडीची मोजणी फी २.१३ लक्ष भुमीअभिलेख कार्यालयास दिले आहेत. अद्याप मोजणीची तारीख निश्चीत नसल्याचे क्षेत्र व्यवस्थापक यांनी सांगितले. या बाबत प्रा.अ. मऔविम यांनी एसएलआर शी संपर्क साधुन मोजणी तारीख निश्चीतीसाठी मा.अध्यक्ष यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करणेसाठी सबंधीतांना पत्र देण्यांत यावे असे ठरले. | उविअ धुळे भाग / एसएलआर / प्रा.अ. मऔविम धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | नरडाणा ग्रोथ सेंटर मध्ये नविन पाईपलाईन टाकुन पाणी उपलब्ध करुन देणे व अविकसीत भुखंड ताब्यातत घेणे बाबत - मा. आमदार श्री.जयकुमार रावल-१००१११(५) | नरडाणा विकास केंद्रासाठी घेण्यांत आलेल्या दोन बोअरवेलला विजपुरवठा करण्याच्या प्रस्तावाचे अंदाजपत्राकास अ.अ.महावितरण यांनी मंजुरी दिली लाईनचे काम चालु आहे, वर्कऑर्डर झाली असल्याचे का.अ. मऔविम यांनी सांगितले.<br>तसेच सुकवद येथील मऔविमच्या पाणी शुध्दीकरण केंद्राच्या रोहीत्र नादुरुस्त असुन महावितरणने दुरुस्त करणेसाठी का.अ. मऔविम यांनी दि.०६.०१.२०१२ च्या पत्रान्वये अ.अ.महातिवरण कं.स कळविले आहे. सदरचा ट्रान्सफार्मर महावितरणने तात्काळ दुरुस्त करावा असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. सदरचा विषय वगळण्यांत यावा अये सर्वानुमते ठरले. | काअ मऔविम धुळे / अअ महावितरण धुळे |
| ६ | मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यात सुविधा मिळणे बाबत व ईएसआयचा फायदा घेतलेल्या समासदांसाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था होणे बाबत- श्री नितीन बंग,मु.प्र.- खांदेश औद्योगिक विकास परिषद-०२१११०(६) | मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यात रुग्नांना स्टाफ अभावी सुविधा मिळत नाही, स्टाफ भरणे बाबत व मेडीकल कॉलेजला ईएसआय कर्मचा-यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करणेसाठी ईएसआय पुणे यांना मा.अध्यक्ष यांचे सहीने अ.शा.पत्राव्दारे दिनांक ०३.०१.२०१२ अन्वये कळविण्यांत आलेले आहे. सदर विषयाबाबत मा.अध्यक्षांनी अत्यंत तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. | ईएसआय धुळे |
| ७<br>८ | मे.किरण लॅब प्लास्ट, ए-३ उद्योगनगर सह संस्था – घटका समोरील अतिक्रमणा बाबत १४०८०९(१०)<br>ए-१० भुखंडावरील अतिक्रमण काढुन भुखंड हस्तांतरण करुन मिळणे बाबत - अध्यक्ष उद्योगनगर सह संस्था धुळे १००१११(५) | दिनांक १०.१२.२०११ रोजी नॅशनल हायवे व मऔविम ने संयुक्तरित्या अतिक्रमण निर्मुलन मोहीम घेतली परंतु प्रचंड जमाव जमल्याने व जमावाचा रोष पाहुन काही अनुचीत घटना घडु नये म्हणुन अतिक्रमण निर्मुलन मोहीम त्यावेळी स्थगित केली असल्याचे का.अ. मऔविम यांनी सांगितले. नॅशनल हायवे नाशिक येथील कोणीही सभेस उपस्थित नव्हते. या बाबत सदरचे अतिक्रमण निर्मुलनासाठी मऔविम व नॅशनल हायवे यांनी पुरेशी पोलीस मदत घेवुन सदरचे दोनही अतिक्रमणे तात्काळ काढण्यात यावीत असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | का अ मऔविम धुळे / काअ नॅशनल हायवे / पोलीस अधिक्षक |
| ९ | मऔविम क्षेत्रातील विजबिले वेळेवर मिळणे बाबत - सर्व संघटना-१३०६११(३) | मऔविम क्षेत्रातील उद्योजकांना विज बिल वेळेवर मिळणे बाबतच्या सुचना संबंधीत उ.वि.प्रमुख, शाखाप्रमुख यांना देण्यांत आलेल्या असल्याचे उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले. चेकव्दारे रकमा जमा केल्यास चेक ज्या दिवशी क्लिअर होतो, ती तारीख महावितरण ग्राहय धरते त्यामुळे प्रॉम्प्ट प्रेमेंट सवलतीचा फायदा मिळत नसल्याचे सर्व औ.संघटनांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन मा.अध्यक्ष यांनी खालील प्रमाणे सुचना केल्या.<br>१) प्रॉम्प्ट पेमेंट तारखेच्या दोन दिवस अगोदरच्या तारखेचा चेक जमा करावा.<br>२) रक्कम स्विकारण्यास मऔविम परिसरात महा-ई-सेवा केंद्र सुरु करता येईल काय यासाठी श्री गणेश मिसाळ, उपजिल्हाधिकारी यांचेशी महावितरणने संपर्क साधावा.<br>४) शहरातील सर्व शाखांत नेटबॅकींग सुविधा असुन त्याव्दारे सुध्दा विजबिल जमा करता येईल.<br>३) स्टेट बॅक एमआयडीसी शाखेत बहुतेक सर्व उद्योजकांचे खाते आहेत, महावितरणाकडे जमा करावयाच्या रकमेचा खाते क्रमांक सर्व उद्योजकांना उपलब्ध करुन द्यावा म्हणजे ईसीएसव्दारे पेमेंट करता येईल असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. या बाबत महावितरणचे प्रतिनिधी यांनी यासाठी वरिष्ठ कार्यालयाची संमती घ्यावी लागेल असे सांगितले. या बाबत लवकरांत लवकर वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधुन उद्योजकांची समस्या सोडवावी, असे आदेश मा.अध्यक्ष यांनी दिले. | अअ महावितरण /सर्व औ.संघटना |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | मे.ओमशांती ग्रुप साठी एक्सप्रेस फिडर वरुन मिळत असलेला विज पुरवठा पुर्ण दाबाने व नियम त होणे बाबत श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे-१३०६११(३) | ओमशांती ग्रुपसाठी त्यांनी २५.०० लक्ष रुपये भरुन स्वतंत्र फिडर घेतले आहे. त्यांना २४ तास विज उपलब्ध होत नसल्यामुळे प्रोसेसींग केलेल्या कच्या मालाचे लाखोंचे नुकसान होत आहे. यासाठी मा.अध्यक्ष यांचे सहीने दिनांक ०३.०१.२०१२ ला अ.शा.पत्राव्दारे तात्काळ कार्यवाही करणेसाठी विनंती करण्यांत आलेली आहे. या बाबत सविस्तर चर्चा होवुन सदर ग्रुपला एक्सप्रेस फिडर वरुन नियमीत विजेचा पुरवठा होण्याचे काम जानेवारी २०१२ अखेर पुर्ण होईल असे महावितरण प्रतिनिधींनी सांगितले. | अ.अ. महावितरण धुळे |
| ११ | बंद पडलेल्या कारखान्यास पुर्ववत विज पुरवठा मिळणे बाबत - श्री सुरेश जुगराज मुथा, प्लॉट नं.११/१२/१३ उद्योग नगर सहकारी संस्था लि. धुळे - १३०६११(३) | सदर ग्राहकाने पुर्वीची थकबाकी एकरकमी भरल्यास नविन विज पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यांत येईल तसेच सदर ग्राहकाने अद्याप ए-वन फार्म महावितरण कडे सादर केलेला नसल्याचे महावितरण प्रतिनिधींनी सांगितले. या बाबत चर्चा होवुन वरील प्रमाणे पुर्तता झाल्यांनतर महावितरणने घटकास विजपुरवठा देण्यांत यावा व सदरचा विषय वगळण्यांत यावा असे ठरले. | अ.अ. महावितरण धुळे |
| १२ | मऔविम क्षेत्रात गटारींची व सांडपाण्याची व्यवस्था करणे बाबत -श्री देवेंद्र राजपूत, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती - १३०६११(३) | नॅशनल हायवे व मऔविम यांनी दिनांक ०५.१२.२०११ रोजी प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी केली असुन नॅशनल हायवेच्या अधिका-यांना सर्व परिस्थिती जागेवर दाखविण्यात आली का.अ मऔविम यांनी सांगितले. नॅशनल हायवे नाशिक कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. या बाबत नॅशनल हायवे, मऔविम, व औ.संघटना यांनी संयुक्त पाहणी करुन तसेच सभा घेवुन सविस्तर अहवाल मा.अध्यक्ष यांना सादर करावा. | काअ मऔविम धुळे / नॅशनल हायवे / औ.सं. |
| १३ | मऔविम सबंधीत<br>१ वसाहतील उद्योगांकडुन थकीत सर्व्हीस टॅक्स वसुली बाबत<br>२ भुखंड खरेदीची रक्कम ही सध्या डिमांड ड्राफ्टव्दारे घेतली जाते ती आरटीजीएस व्दारा घेतली जावी.<br>३ नरडाणा व डीएमआयसीसाठी वेगळे उपविभागीय कार्यालय असावे.<br>४ पाणी उपलब्ध व वापर या बाबत खुलासा<br>५ वसाहतीतील भुखंडाच्या माहिती बाबतचा खुलासा<br>६ वसाहतीत सांडपाणी निचरा होण्याची सध्याची व्यवस्था तोकडी आहे, त्याबाबतचा नकाशा असल्यास तो मिळावा.<br>श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औद्योगिक विकास परिषद धुळे-२९१११११(२) | का.अ. मऔविम यांनी पत्र क्र ४९ दिनांक ०३.०१.२०१२ नुसार सविस्तर अनुपालन या कार्यालयास पाठवलेले असुन त्याची प्रत ईमेलव्दारे जिडकेंने दिनांक ११.०१.२०१२ रोजी सर्व औ.संघटनांना पाठविण्यांत आली होती. .त्यापैकी खालील विषयांवर कार्यवाही करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले.<br>१) धुळे, नरडाणा व डीआयसीसाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय निर्माण करण्यासाठी सदर बाब धोरणात्मक असल्याने सदरचा विषय राज्य उद्योग मित्रकडे पाठवावा असे ठरले.<br>२) श्री बंग यांचे भुखंडावरील सांडपाणी /पावसाचे पाणी निच-याची व्यवस्था नाही, त्यांच्या मागच्या बाजुच्या भुखंडा धारकाला नाल्याची जागा दिली असुन त्यांनी भर टाकल्याने पाण्याचा निचरा होत नाही. असे संबंधीतांनी सांगितले. सदर भुखंडातुन निच-यासाठी स्ट्रीप का.अ. मऔविम यांनी प्रा.अ.मऔविम यांचेकडे मागणी केली आहे. या बाबत सविस्तर चर्चा होवुन प्रा.अ. मऔविम यांनी तात्काळ कार्यवाही करुन यातुन मार्ग काढणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | प्रा अ काअ मऔविम धुळे |
| १४ | राष्ट्रीय महामार्गावर वसाहतीत जाण्यासाठी गुरुव्दारा पासुन (उड्डाण पुलाखालुन) ते सुरत बायपास (हॉटेल रेसिडेंसी पार्क) पर्यंत सर्व्हीस रोड त्वरित सुरु करावा व तसेच पुढील सर्व्हीस रोड सुरु करावा - श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औद्योगिक विकास परिषद धुळे २९१११११(२) | या बाबत राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हीस रोडचा वापर काही गॅरेजवाले करीत असुन त्यामुळे सर्व्हीस रोडवरील वाहतुकीस अडथळा येत असल्याचे काही ठिकाणी सर्व्हीस रोडचे काम अपुर्ण असल्याचे औ.संघटनांनी सांगितले. गुरुव्दारा ते सुरत बायपास पर्यंतचा सर्व्हिस रोड सुरु करावा अतिक्रमण धारकाना काढण्यासाठी आवश्यकता भासल्यास नॅशनल हायवे यांनी पोलीस अधिक्षक यांचेशी चर्चा करावी. या बाबत नॅशनल हायवे नाशिक व औद्योगिक संघटना यांची संयुक्त सभा जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात करण्यांत येवुन अहवाल मा.अध्यक्ष यांना सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | राष्ट्रीय महामार्ग धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | मऔविम धुळे क्षेत्रातील ब-याच उद्योजकांना ग्रापं अवधान यांनी बांधकाम व उद्योग सुरु करण्याची परवानगी न घेतल्यामुळे बेकायदेशिर बांधकामावर उद्योग सुरु केल्याबाबत बजावलेल्या बेकायदेशिर नोटीसा बाबत - श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औ.वि.परिषद धुळे २९११११(२) | गट विकास अधिकारी धुळे यांनी चौकशी करुन संबंधित ग्रापं ने अशा नोटीसा पाठवल्या असल्याचे मान्य केले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन ग्रामपंचायत हद्दीत असलेली बांधकामे, रिक्त भुखंड याची माहिती ग्रामपंचायतीला असणे आवश्यक असल्याने यापुढे ग्रामपंचायतीने उद्योजकांऐवजी का.अ. मऔविम यांचेकडे संपर्क साधुन क्षेत्रातील बांधकामाची माहिती उपलब्ध करुन घ्यावी यासाठी उद्योजकांकडे तगादा करण्याची आवश्यक नसल्याचे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. याबाबत गट विकास अधिकारी यांनी संबंधीत ग्रामपंचायतीला योग्य सुचना निर्गमीत करण्यांत याव्यात. असे ठरले. | उपमुख्य कार्य. अधिकारी (ग्रापं) व गट विकास अधिकारी |
| १६ | ऑईलमिल व्यवसायातील काही सभासदांचे विक्रीकर परतावा मिळण्यास विलंब होत असुन ते तात्काळ मिळणेची कार्यवाही करणे बाबत– धुळे ऑईल सिड्स क्रशर असोशिएशन धुळे २९११११(२) | प्रलंबीत ११ घटकांचे विक्रीकर परतावे दावे मंजुर केले असुन विक्रीकर मुख्यालयाकडे वितरणासाठी तरतुद मागणी केली असल्याचे व तसेच जिल्हकेंकडे रिफंडसाठी आल्यास त्यांना विक्रीकर कार्यालयाकडे संपर्क साधणे बाबत श्री ठाकुर यांनी सांगितले. तर प्रलंबीत दावे यापुढे तात्काळ निकाली काढणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना करुन सदर विषय वगळणेत यावा असे ठरले. | विक्रीकर कार्यालय |
| १७ | जिल्हात वनविभागाच्या जमिनीवर वृक्ष लागवड करणे बाबत -२९११११(२) | शासनाने धुळे जिल्हयासाठी वनविभागाच्या ३०० हेक्टर जमिनीवर ३ लक्ष झाडे लावण्याचे उदिष्ट दिलेले असुन त्यासाठी एनजीओ व जिल्हयातील सर्व औ.संघटनांनी पुढाकार घेवुन राष्ट्रीय कार्यास हातभार लावणे बाबत मा.अध्यक्ष यांनी मागील सभेत सांगितले होते. वनविभागाच्या कार्यालयात दिनांक ०७.१२.२०११ रोजी सभा आयोजीत करण्यांत आली होती. या बाबत औद्योगिक संघटनांकडुन प्रतिसाद मिळत नसल्यामुळे मा.अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. वृक्ष लागवडीमध्ये एनजीओंना आर्थिक फायदा मिळत नसल्याने कोणीही पुढाकार घेण्यास तयार नसल्याचे औ.संघटनांच्या पदाधिका-यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन निसर्गाची सेवा करण्याची खुप मोठी संधी जिल्हयातील औ.संघटनाना मिळाली असुन सर्व संघटनांनी तात्काळ एकत्रित सभा घेवुन वृक्ष लागवडीसाठीचे नियोजन करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | वन विभाग |
| १८ | दोंडाईचा येथील स्टार्च फॅक्टरी परिसरातील दुषीत पाण्याबाबत -२९११११(१) | दोंडाईचा येथील स्टार्च फॅक्टरी परिसरातील पाण्याचे नमुने गावक-यां समक्ष पंचनामा करुन घेवुन प्रयोगशाळेत तपासले असुन ते दुषीत नसल्याचे उप प्रा अ एमपीसीबी जळगांव यांनी सांगितले. मार्च एप्रिल महिन्यात परिसरात पाणी खराब झाले होते. प्रदुषण न होणे बाबत योग्य ती यंत्रणा घटकास बसवलेली असल्याचे संबंधीतांनी सांगितले. भविष्यात काही अडचणी येणार नाहीत याची संबंधीतांनी काळजी घेणे बाबत मा.अध्यक्षांनी सांगितले. सदर विषय वगळण्यांत यावा असे ठरले. | उप प्रा अ एमपीसी बी जळगांव |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नविन विषय / आयत्या वेळचे विषय | | |
| १ | विजपुरवठ्यासाठी पुर्वीसारखी योजना कार्यान्वित होणे बाबत - सर्व औ.संघटना | पुर्वी मऔविम क्षेत्रातील लघु उद्योगांना ट्रांसफार्मर उभारणी व विजजोडणीसाठी महावितरण व मऔविम यांच्यामध्ये एक योजना कार्यान्वित होती. .त्यामुळे ट्रांसफार्मर व विजजोडणीचा सुरुवातीचा खर्च महावितरण करीत असे व नंतर ती ग्राहकाकडुन विजबिलातुन हप्त्याने वसुल करीत असे. सदरची योजना सध्या बंद असल्यामुळे उद्योग उभारणीच्या वेळीच ट्रांसफार्मर व विजजोडणीचा खर्च लघु उद्योगांना जास्त होत असल्याचे सर्व औद्योगिक संघटनांनी सांगुन सदर योजना पुन्हा कार्यान्वित करणे बाबत मागणी करण्यांत आली. यावर सविस्तर चर्चा होवुन सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी राज्य उद्योग मित्र मुंबई यांचेकडे शिफारस करण्यासाठी तांत्रिक तपशिलासह का.अ. मऔविम यांनी तात्काळ प्रस्ताव सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | का.अ मऔविम धुळे |
| २ | ट्रक टर्मिनल / पार्कींग झोन कार्यान्वित होणे बाबत- श्री प्रकाश बागुल, अध्यक्ष लउभा धुळे | मऔविम क्षेत्रात ट्रक टर्मिनल / पार्कींग झोन नसल्यामुळे वाहने बेजबाबदार पणे पार्कींग करीत असल्यामुळे वाहतुकीला खुप वेळेस अडचणी येत असल्याचे सर्वच औ.संघटनांनी सांगितले. या बाबत चर्चा होवुन ट्रक टर्मिनलसाठीचा प्रस्ताव मऔविम मुख्यालयास सादर केला असल्याचे सबंधीतांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन सदर प्रस्ताव मंजुरीच्या दृष्टिने प्रा अ मऔविम यांनी मुख्यालयाकडे पाठपुरावा करावा असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ मऔविम धुळे |
| ३ | लेबर सेस वसुली बाबत- श्री नितीन बंग मुख्य प्रवर्तक खांदेश औ.विकास परिषद | मऔविम क्षेत्रात बांधकाम क्षेत्रावर १ टक्के लेबर सेस सर्व उद्योग घटकांककडुन आकारला असुन तो कामगार विभागाच्या सुचनांप्रमाणे वसुली केली जात असल्याचे का.अ. मऔविम यांनी सांगितले. तर श्री नितीन बंग यांनी सदर कर हा ज्या फॅक्टरी ॲक्ट लागु आहे त्यांनाच लागु असुन फॅक्टरी ॲक्ट लागु नसलेल्या उद्योजकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड भरावा लागत असल्याचे सांगितले. या बाबत सदर विषय राज्य उद्योग मित्र कडे चर्चेला घेतलेला असुन निश्चीत लेबर सेस वसुली कोणाकडुन करायची या बाबत राज्य उद्योग मित्र यांचे कडे पाठवावा असे सर्वानुमते ठरले. | जिउकें धुळे |

ब. जिल्हा पुरस्कार योजना-२०११ निवड साठी येत असलेल्या अडचणी बाबत

दिनांक २९.११.२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र व जिल्हा सल्लागार समिती सभेत जेष्ठ सदस्य श्री मदनलाल सुराणा यांनी जिल्हा पुरस्कार योजनेत अर्ज करण्यासाठी स्पर्धा दिसुन येत नाही या करीता निवडीमध्ये असलेल्या त्रुटींचा शोध घेणे तसेच जास्तीत जास्त औद्योगिक संघटनांचा सहभाग व्हावा अशी सुचना केली होती. .त्याप्रमाणे दिनांक २९.१२.२०११ रोजी सर्व औद्योगिक संघटनांची सभा आयोजीत करण्यांत आली होती. सदर सभेत जिल्हा पुरस्कार योजने विषयी माहिती देण्यांत आली. जिल्हयातील लघु उद्योग घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योग संचालनालया मार्फत जिल्हा पुरस्कार योजना राबविण्यांत येते आहे. या योजने खाली प्रथम व व्दितीय असे दोन उत्कृष्ट लघु उद्योग घटकांना महाराष्ट्र शासनाकडुन पुरस्कार देण्यांत येतात. प्रथम पुरस्काराचे स्वरुप रुपये १५,०००/- रोख व गौरवचिन्ह, शाल श्रीफळ तर व्दितीय व्दितीय पुरस्काराचे स्वरुप रुपये १०,०००/- रोख व गौरवचिन्ह, शाल श्रीफळ असे शासनाने ठरवुन दिलेले असल्याचे सांगितले.

जिल्हा पुरस्कार योजनेत भाग घेणे करीता लघु उद्योग घटकांचे उद्योग संचालनालयाकडे मागील तीन वर्षापूर्वीच्या कालावधीमध्ये स्थाई लघु उद्योग घटक म्हणून नोंदणीकृत झालेला व कमीत कमी दोन वर्ष सलग उत्पादन करीत असलेला नफयात असणारा व वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसलेला लघु उद्योग घटक या योजनेत भाग होऊ शकतो. सन २०११ च्या पुरस्कारा करिता दिनांक ०१/०१/२००८ पूर्वी लघु उद्योग घटक स्थाई नोंदणीकृत (ईएम भाग-२) असणे आवश्यक आहे.

सदर पुरस्कारासाठी शासनाकडुन दरवर्षी रुपये ३००००/- तरतुद मिळत असुन रुपये २५०००/- रोख स्वरुपात सबंधीत घटकांना व रुपये ५०००/- हे गौरवचिन्ह, शाल, श्रीफळ, कार्यक्रम पत्रिका यासाठी खर्च करण्यासाठी असतात. तरतुद मर्यादित रकमेची असल्यामुळे कार्यक्रमासाठी जास्त खर्च करता येत नाही. यासाठी किमान ५००००/- तरतुद मिळावी अशी सर्व औद्योगिक संघटनांनी मागणी केली असता जास्त तरतुदीसाठी व गौरवचिन्हाचा आकार वाढण्यासाठी औद्योगिक संघटनांनी राज्य उद्योग मित्रकडे पाठपुरावा केल्यास जास्त तरतुद मिळु शकेल, सदर बाब धोरणात्मक असल्याने शासन स्तरावर या सबंधी निर्णय घेण्यांत येतो असे महाव्यवस्थापक यांनी सांगितले होते.

सदर पुरस्कारा बरोबर औद्योगिक संघटनांनी त्यांचे वैयक्तिक पुरस्कार (मोमेंटो) उत्कृष्ठ उद्योजकांना देणे शक्य असुन कार्यक्रमास जास्त प्रसिध्दी देवुन मोठा कार्यक्रम करण्यासाठी खाजगी उद्योजक प्रायोजक म्हणुन सहभागी करुन घ्यावे व पुढील पुरस्कार वितरणासाठी मा.मंत्री महोदय व राज्य पातळीवरील उद्योजकांना आमंत्रीत करावे असे सर्वानुमते ठरले होते.

जास्त अर्ज प्राप्त होत नसल्यामुळे निवड प्रक्रियामध्ये स्पर्धा होत नाही, त्यामुळे पुरस्कार निवड करण्यात अडचणी येतात. जास्तीत जास्त अर्ज मिळण्यासाठी सन २००८ चे अगोदर नोंदणी झालेल्या उद्योग घटकांना तालुका उद्योग निरिक्षक यांनी प्रत्यक्ष संपर्क साधुन मार्गदर्शन करुन अर्ज करणेबाबत आवाहन करणे विषयी औद्योगिक संघटनांनी सांगितले होते.

अर्ज करणेसाठी उद्योजक स्वतः येत नसल्यामुळे औद्योगिक संघटनांनी पुढाकार घेवुन त्याचे सभासद उद्योजकांना अर्ज करणेसाठी आवाहन करुन प्रत्येक औद्योगिक संघटनांनी किमान एका सभासद उद्योजकाचे अर्ज ३१ जानेवारी २०१२ अखेर प्राप्त करुन जिल्हा उद्योग केंद्राकडे पाठवावे, तसेच जिल्हा उद्योग केंद्राकडे नोंदणीकृत घटकांची यादी ईमेलव्दारे सर्व औद्योगिक संघटनांना तात्काळ उपलब्ध करुन देण्यांत आलेली असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. तरी सर्व औद्योगिक संघटनांनी प्रत्येकी दोन जिल्हा पुरस्काराचे अर्ज भरुन जिल्हा उद्योग केंद्राकडे दिनांक ३१.०१.२०१२ पुर्वी पाठवावेत, म्हणजे सदर अर्जाची छाननी उपसमितीव्दारे करण्यांत येवुन मा.अध्यक्षांचे परवानगीने पुढील सभेत निर्णय घेणेत येईल.

तसेच पुढील जिल्हा पुरस्कार वितरण व एमआयडीसीचे बांधकाम पुर्ण झालेले असल्यास उदघाटनासाठी मा.ना.श्री नारायणराव राणे साहेब, उद्योग मंत्री, महाराष्ट्र शासन यांचे शुभहस्ते एकत्रित कार्यक्रम आयोजीत करण्यांत यावा असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. तसा जिल्हा उद्योग मित्र समितीचा ठराव राज्य उद्योग मित्र कडे सादर करण्यांत यावा असे ठरले.

शेवटी मा.अध्यक्ष यांचे व सर्व सदस्यांचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले.

सही/-
महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
मा. अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी धुळे

मा.श्री. प्रकाश महाजन (भाप्रसे) जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३.०१.२०१२ रोजी झालेल्या स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य समिती सभेचे इतिवृत्त ( स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय धुळे )

---

सभेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे व उपस्थितांचे स्वागत करुन .त्यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. सभेत खालील प्रमाणे चर्चा झाली.

स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य देण्या बाबत आढावा घेणे -

या बाबत सदस्य सचिव यांनी सांगितले की, जिल्हयातील सर्व नोंदणीकृत सुक्ष्म, लघु मध्यम मोठ्या उपक्रमामधील स्थानिक कामगारांची संख्या शासनाने ठरवुन दिलेल्या विहीत मर्यादेत आहे. या बाबत स्थानिक लोकांना रोजगार प्राधान्य देण्याचे दृष्टिने उद्योजकांना काही अडचणी असतील तर .त्यांनी जिल्हा उद्योग केंद्राकडे संपर्क साधावा तसेच सर्व घटकांनी आपापल्या घटकाचा विहीत नमुन्यातील ईएलपी भाग-१ चा अर्ज भरुन जिल्हा उद्योग केंद्राकडे सादर करावा. यासाठी सर्व औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी आपापल्या संघटनेतील सभासद उद्योजकांना याची कल्पना देणेस विषयी विनंती केली.

शेवटी कोणतेही आयत्या वेळचे विषय नसल्याने मा.अध्यक्ष यांचे व सर्व सदस्यांचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहिर केले.

सही/-

महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
मा.अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी धुळे

मा.श्री. प्रकाश महाजन (भाप्रसे) जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३.०४.२०१२ रोजी झालेल्या जिल्हा स्तरीय आजारी उद्योग पुर्नज्जिवन समिती सभेचे इतिवृत्त ( स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय धुळे )

---

सभेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे व उपस्थितांचे स्वागत करुन त्यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. सभेत खालील प्रमाणे चर्चा झाली.

आजारी उद्योग घटकांचे पुर्नवसना बाबत चर्चा करणे

जिल्हात आजारी असलेल्या सुक्ष्म, लघु मध्यम उद्योग घटकांचे आजारी उद्योग पुर्नवसनासाठी कोणताही अर्ज प्रलंबीत नाही, तसेच ज्या उद्योग घटकांना पुनर्वसनासाठी मार्गदर्शन हवे आहे त्यांनी जिल्हा उद्योग केंद्राकडे संपर्क साधावा, असे सदस्य सचिव यांनी सांगितले.

शेवटी कोणतेही आयत्या वेळचे विषय नसल्याने मा.अध्यक्ष यांचे व सर्व सदस्यांचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले.

सही/-
महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
मा.अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी धुळे

मा.श्री. प्रकाश महाजन (भाप्रसे) जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०३.०१.२०१२ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र, स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य, जिल्हा स्तरीय आजारी उद्योग पुर्नज्जिवन समिती सभांना उपस्थित सदस्य ( स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय धुळे )

मा.सर्वश्री

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.प्रकाश महाजन, भाप्रसे जिल्हाधिकारी धुळे | अध्यक्ष |
| २. | नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औ.विकास परिषद धुळे | |
| ३. | प्रकाश बागुल, अध्यक्ष लघु उद्योग भारती धुळे | |
| ४. | नितीन देवरे अध्यक्ष डामा धुळे | |
| ५. | रसिकलाल जैन, उद्योगनगर सहकारी संस्था धुळे | |
| ६. | देवेंद्रसिंग राजपुत, अध्यक्ष लघु उद्योग भारती धुळे | |
| ७. | श्रीकांत कुलकर्णी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य धुळे | |
| ८. | व्ही डी कोळवाले शाअ विद्युत निरिक्षक कार्यालय धुळे | |
| ९. | नितिन अग्रवाल प्रतिनिधी खांदेश जिनप्रेस संघटना धुळे | |
| १०. | डॉ अविनाश तवली, राज्यकामगार विमा दवाखाना धुळे | |
| ११. | किशोर के अग्रवाल, अध्यक्ष, धुळे ऑईल सिड क्रशर संघटना धुळे | |
| १२. | पी टी महाजन मिटकॉन धुळे | |
| १३. | अशोक भंडारी उद्योजग उद्योगनगर सह संस्था धुळे | |
| १४. | सुनिल अग्रवाल धुळे ऑईलसिड क्रशर संघटना धुळे | |
| १५. | राजेंद्र जैन, सचिव डामा धुळे | |
| १६. | ए आर ठाकरे जिल्हा रोजगार स्वयंरोजगार कार्याल धुळे | |
| १७. | श्रीकांत मावरगे, ईएसआयसी दवाखाना धुळे | |
| १८. | एस आर शिंपी, ईएसआयसी दवाखाना धुळे | |
| १९. | अरविंद बोरसे, एजीएम नाबार्ड धुळे | |
| २०. | प्रशांत पाटील प्रकल्प अधिकारी एमसीईडी धुळे | |
| २१. | बी एम कुकडे उप प्रा अ. एमपीसीबी जळगांव | |
| २२. | पी पी काकडे ज्यु.इंजिनिअर महावितरण कं. धुळे | |
| २३. | एस एस सराफ, कार्यकारी अभियंता महावितरण कं धुळे | |
| २४. | टी ए ठाकरे एमपीसीबी जळगांव | |
| २५. | एस व्ही तिंगडे, एमपीसीबी जळगांव | |
| २६. | रमेशचंद्र पाचपोळे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी धुळे | |
| २५. | जिल्हा माहिती अधिकारी प्रतिनिधी धुळे | |
| २६. | ए यु ठाकुर सहा विक्रीकर आयुक्त विक्रीकर कार्यालय धुळे | |
| २७. | एन पी पाटील, उपअभियंता, मऔविम धुळे | |
| २८. | वाय जे बोडरे, कार्यकारी अभियंता मऔविम धुळे | |
| २९. | डी एल सपकाळे क्षेत्र व्यवस्थापक मऔविम धुळे | |
| ३०. | डी के निकम, जिल्हा अग्रणी प्रबंधक सेंट्रल बँक ऑफ इंडिया धुळे | |
| ३१. | सतिश भामरे, महाव्यवस्थापक जिउकें धुळे | सदस्य सचिव |

०००